## <u>रे.मु.नं. 119/11 मधिल निशाणी 44 खालील आदेश</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज दि. प्र. स. आदेश 26 नियम 9 अन्वये दाखल केला असून वादी व प्रतिवादी यांचे गट क्र. 1418,1417 व 1411 ग्रमपंचायत पारगाव ता. दौंड ची मोजणी करुन मिळणे बाबत दिलेला आहे.

2. वादीचे पुढे कथन असे आहे की, वादीचा गट नं. 1418, हा भुमिअभिलेख दैांड यांच्या कडून मोजणी करुन घेतला असून सदर गट वादीचे ताब्यात व वहिवाटीत आहे. सदर गट नंबर वर प्रतिवादी क्र 4 व 5 यांनी 11 आर इतके अतिक्रमण केले आहे. नकाशाप्रमाणे जे पडीक क्षेत्र दाखविण्यात आले आहे ते वादीचे मालकीचे असून प्रतिवादी क्र 1 ते 3 यांनी वादीच्या मालकीच्या पडीक क्षेत्रावर अतिक्रमण करुन बांधकाम करण्याकरीता बींम उभे केले आहे. वरील वाद कायमस्वरुपी मिटणेकरीता वादीचा गट नं 1418 व प्रतिवादीचे गट नं.1417 व 1411 ची संयुक्तीक मोजणी तुालुका निरीक्षक भुमिअभिलेख दौंड यांच्या मार्फत होणे गरजेचे आहे. गट नं 1418 ची मोजणी फी भरणेस वादी तयार आहे करीता अर्ज मजुंर करण्याची विनंती केली आहे.

3. प्रतिवादीनीं सदर अर्जास म्हणणे देउन वादींचे म्हणणे अमान्य आहे. वादी मुळ दाव्यामध्ये अतिक्रमण करुन मागतात. केवळ पुरावा गोळा करण्याकरीता अर्ज दाखल करता येणार नाही. करीता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

4. दोन्ही पक्षाच्या युक्तीवाद ऐकला वादीचा दावा, प्रतिवादी क्र 1 ते 3 यांच्या दाव्यास कैफियत <u>नि 35</u> तसेच प्रतिवादी क्र 4 ते 5 कैफियत <u>नि 33</u> तसेच दाव्या सोबत दाखल असलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रतिवादींच्या विरोधात दाखल केलेल्या दावा हा अतिक्रमण काढून मिळणे करीता दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादीने ता. भुमिअभिलेख यांचे कडून दावा मिळकतीची मोजणी करुन घेतली आहे. सदर मोजणीच्या वेळी प्रतिवादी हजर नसलेने मोजणी ही कायदयांतर्गत झालेली नाही. वादीने सदरचा अर्ज दाव्याचे पुराव्याचे कामकाज सुरु झाले नंतर दाखल केला असला तरी देखील सत्य परिस्थिती न्यायालया

समोर येण्याकरीता वादी व प्रतिवादी चे गट नं. 1418,1417 व 1411 ची संयुक्तीक मोजणी आवश्यक आहे. वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीना कोणत्याही प्रकारची हानी पोहोचणार नाही. करीता पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**1.** वादीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2. तालुका भुमिअभिलेख दौंड.जि. पुणे यांना आदेशीत करण्यात येते की, गट नं 1418,1417 व 1411 ग्रमपंचायत पारगाव (सा.मा.) ता. दौंड यांची संयुक्तीक मोजणी तात्काळ फी भरुन घेवून एक महिन्यामत गट नं 1418 वर अतिक्रमण झाले किंवा नाही याबाबतचा सविस्तर अहवाल न्यायालयास पाठवावा.

3. वादीनी गट न 1418,1417 व 1411 च्या संयुक्तीक मोजणीची अतितात्काळ फी भुमिअभिलेख कार्यलय दौंड यांचेकडे 8 दिवसात जमा करावी.

4. मोजणी फी भरल्याबाबतचे चलन न्यायालयात जमा झाल्यानंतर संबंधीत क्लर्क ने वादी कडून आवश्यक कागदपत्राची पुर्तता करुन घ्यावी व भुमिअभिलेख कार्यलयाकडे आदेशान्वये मोजणी आदेश (रिट) पाठवावेत.

सही/—

दि. 27.10.2015

**मीना प्र. इखे**
2 रे सह दिवाणी न्यायाधिश क स्तर,
ता.दौंड.जि.पुणे

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.V. Kulkarni |
| Court | : | Mrs. M.P. Ekhe, JMFC, (Court No.2), Daund. |
| Date | : | 27.10.2015. |
| Judgment signed by the presiding officer on | : | 27.10.2015. |
| Judgment uploaded on | : | 28.10.2015. |